# भारतीय डाक विभाग

## प्रवर अधीक्षक डाकघर नागपूर ग्रामीण विभाग नागपूर-४४०००२ यांचे कार्यालय

# टपाल जीवन विमाकरिता थेट अभिकर्त्यांची नियुक्ती करण्याकरिता पात्रता आणि अन्य मापदंड

१) **वयोमर्यादा :-** कमीत कमी १८ वर्षे व जास्तीत जास्त ६० वर्षे.

२) **शैक्षणिक अहर्ता :-** मान्यता प्राप्त केंद्रीय/ राज्य सरकारच्या बोर्ड, संस्थामधून १० + २ उत्तीर्ण.

३) **अनुभव :-** आवेदनकर्त्याला विमाक्षेत्रबाबत माहिती तसेच विपणन कुशलता असणे आवश्यक आहे.

४) **पात्रता :-** बेरोजगार/ स्वंयम रोजगार व्यक्ती, माजी जीवन विमा सल्लागार, माजी अभिकर्ता कोणत्याही विमा कंपनीचे, माजी सैनिक, अंगणवाडी सेविका कर्मचारी, महिला मंडळ कर्मचारी, केंद्रीय/ राज्य सेवानिवृत्त कर्मचारी, स्वयंम सहायता समूह पदाधिकारी, इत्यादी. टपाल जीवन विमा थेट अभिकर्त्याकरिता आवेदन करू शकतात.

५) ज्या उमेदवारांची अभिकर्ता म्हणून निवड होईल त्यांना टपाल विभागाने वेळोवेळी ठरविलेले कमिशन/ प्रोत्साहन भत्ता दिला जाईल.

६) थेट मुलाखतीद्वारे टपाल जीवन विमा/ ग्रामीण टपाल जीवन विमा अभिकर्ता म्हणून नियुक्त केलेल्या उमेदवारांना आंतरिक प्रशिक्षण देण्यात येईल. ७) नियुक्त अभिकर्त्यांना परवाना परीक्षेसाठी हजर राहावे लागेल आणि परवाना परीक्षा व प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतरच परवाना देण्यात येईल.

८) नियुक्त अभिकर्त्यांना परवाना देण्याकरिता शुल्क रुपये २५०/- व परवाना परीक्षा शुल्क रुपये ४००/जमा करावे लागेल.

९) निवड झालेल्या थेट अभिकर्त्याला रुपये ५,०००/- राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र किंवा किसान विकासपत्र खरेदी करून मा. राष्ट्रपती यांचे नावे गहाण (तारण) म्हणून ठेवावे लागेल.

१०) थेट मुलाखतीकरिता उमेदवारांनी प्रवर अधीक्षक डाकघर नागपूर ग्रामीण विभाग नागपूर, इतवारा सिटी पोस्ट ऑफिस बिल्डिंग तिसरा माळा, नागपूर- ४४०००२ येथे दिनांक १२/०२/२०२० रोजी सकाळी ११.०० वा. ते ०४.०० वा. पर्यंत आपल्या शैक्षणिक प्रमाणपत्र, पॅन कार्ड, आधार कार्ड व अन्य दस्तावेज ओरिजनल व झेरॉक्स सोबत घेऊन उपस्थित राहावे.

**प्रवर अधीक्षक डाकघर**

**नागपूर ग्रामीण सभाग, नागपूर-४४०००२**